# पुणे पोलीस नोटीस प्रसिध्दीसाठी

जा.क्र.आस्था-३(३)/प्रोत्साहन भत्ता/२०२२/ पुणे,दि. १७/०६/२०२२

**संदर्भ** :-१.महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. पीडब्ल्युएफ- १२०४/१४३ /प्र.क्र२/पोल-७ दि. ०६/११/२००६

२.पुणे पोलीस नोटीस मध्ये जा. क्र. आस्था-३(३)/प्रोत्साहन भत्ता २०२२-२३/२०२१ पुणे, दि.:- १०/१२/२०२१

**विषय** :- सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाकरिता पोलीस बलातील विहित शारीरिक क्षमताधारक पोलीस अंमलदार यांच्यासाठी प्रोत्साहन भत्ता योजना लागु करणे बाबत.

---ooo---

**आदेश**

महाराष्ट्र शासन, गृह विभागाकडील संदर्भ क्र. १ मध्ये नमूद शासन निर्णयानुसार "पोलीस दलातील विहीत शारीरिक क्षमताधारक पोलीस अंमलदार यांच्यासाठी प्रोत्साहन भत्ता योजना" अंतर्गत प्रोत्साहन भत्याचा लाभ देण्याच्या प्रयोजनार्थ पुणे शहर पोलीस घटकाचे आस्थापनेवरील २८९२ पोलीस अंमलदार यांची माहिती संदर्भ क्र. २ अन्वये या कार्यालयात प्राप्त झाली आहे. त्यांची बॉडीमास इंडेक्स वैदयकीय तपासणी दिनांक २०/०६/२०२२ ते ०१/०७/२०२२ (शनिवार व रविवार वगळुन) या कालावधीत दुपारी ११.०० ते १६.०० वाजेपर्यंत शिवाजीनगर पोलीस हॉस्पिटल, शिवाजीनगर, पुणे या ठिकाणी करण्यात येणार आहे.

सोबत जोडण्यात आलेल्या २८९२ यादीतील पोलीस अंमलदार यांचेपैकी आपले पोलीस ठाणे / शाखेस नेमणूकीस असलेल्या पोलीस अंमलदार यांना वरीलप्रमाणे नमूद कालावधीमध्ये शिवाजीनगर पोलीस हॉस्पिटल, शिवाजीनगर, पुणे येथे बॉडीमास इंडेक्स वैदयकीय तपासणीकरीता न चुकता पाठवावे. वैद्यकीय तपासणीस जाताना ओळखपत्र व ओळखपत्र नसल्यास संबंधित पोलीस ठाणे / शाखा प्रभारी अधिकारी यांचे प्रमाणपत्र सोबत घेऊन जाणेबाबत अवगत करावे. सदर यादीमधील कोणताही पोलीस अंमलदार वैदयकीय तपासणीपासुन वंचीत राहणार नाही, तसेच ज्या पोलीस अंमलदारांचे सदर यादीमध्ये नाव नाही त्यांना वैदयकीय तपासणी करण्याकरीता पाठविण्यात येवू नये. याबाबत संबंधित पोलीस ठाणे / शाखा यांचे प्रभारी अधिकारी व डि. ओ. यांनी दक्षता घ्यावी.

**अपर पोलीस आयुक्त, प्रशासन**
**यांचे मान्यतेने**

**( शशीकला भालचिम )**
प्रशासकीय अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर.

प्रति,

सर्व पोलीस ठाणे / शाखा प्रभारी अधिकारी, पुणे शहर
सर्व पोलीस ठाणे / शाखा डि. ओ., पुणे शहर

प्रत,

१) सहा पोलीस आयुक्त, मानवी संसाधन विभाग, मुख्यालय,पुणे शहर

२/- उपरोक्त नमुद प्रमाणे पोलीस आयुक्त, पुणे शहर आस्थापनेवरील पोलीस अंमलदार यांचे बॉडीमास इंडेक्स वैद्यकीय तपासणी शिवाजीनगर हॉस्पिटल, शिवाजीनगर येथे नियोजित करण्यात आलेले कामकाजावर आपली नियंत्रण अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आली आहे. बॉडीमास इंडेक्स वैदयकीय तपासणी करावयाच्या २८९२ पोलीस अंमलदार यांची यादी सोबत जोडली आहे. सदर यादी हॉस्पिटलला देवून, त्यामध्ये संबंधीत अंमलदारांच्या वैदयकीय तपासणी बाबतची माहिती नमूद करण्याबाबत संबंधीत वैदयकीय अधिकारी यांना कळवावे. या कामासाठी मदतनीस म्हणुन आरोग्य समन्वयक म्हणून एक जबाबदार पोलीस अंमलदार यांची नेमणुक करण्यात यावी तसेच त्याच्या मदतीस ४ पोलीस अंमलदार व २ महिला अंमलदार देण्यात यावेत.

२) वैदयकीय अधिकारी, शिवाजीनगर हॉस्पिटल, शिवाजीनगर पुणे

२/- बॉडीमास इंडेक्स वैद्यकीय तपासणीसाठी पोलीस आयुक्त कार्यालयाकडील २८९२ पोलीस अंमलदार हे उपरोक्त नमुद कालावधीमध्ये शिवाजीनगर पोलीस हॉस्पिटल, पुणे येथे उपस्थित राहणार आहेत, त्याची यादी सोबत जोडण्यात आली आहे. तरी सदर अंमलदार यांचे संदर्भ क्र. १ मध्ये नमूद शासन निर्णयान्वये बॉडीमास इंडेक्स वैद्यकीय तपासणी करुन (संबंधीत अंमलदार यांचे वजन, उंची, बीएमआय नमुद असलेले) अहवाल रोजच्या रोज इकडील कार्यालयास सादर करावा. सदर यादी व्यतिरीक्त इतर कोणत्याही पोलीस अंमलदार यांची तपासणी करण्यात येऊ नये.

३) पोलीस निरीक्षक, संगणक विभाग, पुणे शहर

२/- सदर माहीती व २८९२ पोलीस अंमलदार यांची यादी पुणे पोलीस संकेतस्थळावर तात्काळ प्रसिद्ध करण्यात यावी.